# खो-खोवर प्रेम करणारा मार्गदर्शक

**प्रासंगिक**

डॉ. सतीश देसाई



सुरेश दिनकर

**खो-खोसाठी कार्य करणाऱ्या सुरेश दिनकर यांना नवमहाराष्ट्र संघातर्फे आज (गुरुवारी) सायंकाळी ५ वाजता स. प. महाविद्यालयात कृतज्ञता पुरस्कार दिला जाणार आहे. त्यानिमित्त......**

नवमहाराष्ट्र खो-खो संघाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात सुरेश दिनकर या सरांना गुरुदक्षिणा देण्याची कल्पना जेव्हा पुढे आली, तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर सरांची गेल्या ४० वर्षांची कारकीर्द समोर आली. अतिशय शांत स्वभावाचे, परंतु खो-खो या खेळावरती, तसेच नवमहाराष्ट्र संघावरती आणि आपल्या कुटुंबापेक्षा अधिक स. प. महाविद्यालयाच्या मैदानावरती प्रेम करणारे सर मला दिसले. दररोज सकाळी पावणेसहा वाजता स्पोर्टस हाफपँट आणि टी शर्ट घातलेले, हातामध्ये छडी घेतलेले सर दिसतात. गेल्या शंभर वर्षांत झाला नाही इतका पाऊस पुण्यात जेव्हा झाला, तेव्हा कदाचित सर ग्राउंडवरती नसतील असं मला वाटलं आणि मी छत्री घेऊन ग्राउंडवरती गेलो, तर माझ्यापुढेच दिनकर सर चालत होते. मैदानावरती चालू असलेले दिवे बंद करणे, चालू असलेले पाण्याचे नळ बंद करणे, स. प. मैदान झाडणाऱ्या कष्टकरी वर्गाशीसुद्धा दोन शब्द प्रेमाने बोलणारे सर मला आठवतात.

त्यांच्या हातात असलेल्या छडीने दररोज सकाळी खो-खोचे मैदान ते आखणार, आलेल्या मुलांना तयार करणार, त्यांचा सराव करून घेणार आणि जाता जाता असलेल्या झाडांना पाणीसुद्धा घालणार. परवा जेव्हा त्यांना अतिशय रागावलेल्या अवस्थेत पाहिले तेव्हा मी विचारले, ''काय झाले सर?'' तेव्हा ते म्हणाले, ''अरे कष्टाने ही झाडे वाढविली, त्याची फुलं ते काढून घेताहेत. आज फुले काढतील, उद्या झाड तोडतील म्हणून मी हात लावू नका सांगत होतो.'' इतक्या सातव्या पट्टीमध्ये रागावलेले सर कदाचितच मला भेटले असतील. खो-खो या खेळावरती आणि आपल्या नवमहाराष्ट्र संघावरती टोकाचे प्रेम असणारे सर बरोबर पावणेसात वाजता जेव्हा ग्राउंड सोडतात तेव्हा त्यांच्या घराच्या बाहेर त्यांच्या सौभाग्यवती वाट पाहात असतात.

सन १९७३ ला नवमहाराष्ट्र खो-खो संघात प्रवेश केल्यानंतर गेल्या ३७ वर्षांत सरांनी कधी मैदान चुकविले असेल, असे मला वाटत नाही. अनेक खेळाडूंना मैदानावर घडविताना, त्यांच्यावर खेळाबरोबरच होणाऱ्या चांगल्या संस्कारावरही सरांचे लक्ष असते आणि म्हणूनच नवमहाराष्ट्र संघाचे खेळाडू मैदानावर जेवढे चमकतात, तेवढेच अभ्यासामध्ये आणि नंतरच्या आयुष्यामध्ये चमकलेले दिसतात. मुलांच्या सरावाबरोबरच त्यांच्या भवितव्याची सर मनापासून काळजी घेतात. अत्यंत सात्त्विक, संयमी, समजूतदार, समाधानी, सहनशील, सन्मार्गी, सहजतेने दुसऱ्याला आपले करणारे, कायम स्मितहास्य असणारे श्री. सुरेश दिनकर हे नवमहाराष्ट्र संघाचे केवळ कर्ते नाहीत, तर त्यांच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार आहेत. आज जेव्हा नवमहाराष्ट्र संघाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत, तेव्हा स्थापनेचा तो दिवस आठवतो. १९६० मध्ये सुरू केलेली संस्था आज देशामध्ये इतकी अग्रगण्य झालेली पाहणे, त्यात सहभागी होणे आणि त्याच्या उज्ज्वल भवितव्याकरिता रात्रंदिवस झटणे, हा त्यांच्या सुखी जीवनाचा मूलमंत्र आहे. सरांना गुरुदक्षिणा म्हणून जर काही द्यायचे असेल, तर तसेच काम खो-खोच्या वृद्धीकरिता आणि खो-खो आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याकरिता आमच्यामधून होवो, हीच सद्‍भावना!